**MHWS020008622022**

-

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०१/१०/२०२२ |
| नोंदणी दिनांक | : | ०७/१०/२०२२ |
| निकाल दिनांक | : | २५/०९/२०२४ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०१ ११ १८ |

**<u>सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वाशिम यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी : अ. रो. फक्राबादकर)

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.२२२/२०२२</u>** **<u>निशाणी क्र.२०</u>**

बाबाराव ज्ञानबा महाले
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती व व्यापार,
रा. कळंबा महाली, ता. जि. वाशिम. **<u>... वादी.</u>**

**<u>विरुध्द</u>**

राजेंद्र रामदास सौदागर
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी,
रा. नविन आयुडीपी कॉलनी, वाशिम,
ता. जि. वाशिम **<u>... प्रतिवादी.</u>**

---

**दावा : उसनावार चिठ्ठी वरुन रक्कम रुपये २,००,०००/– च्या वसुलीसाठी...**

---

---

वादीतर्फे विधीज्ञ : श्री. ए.आर. देशपांडे
प्रतिवादीतर्फे विधीज्ञ : ए.आर. सोमानी

---

**न्यायनिर्णय**

(दिनांक २५ सप्टेंबर २०२४ रोजी अधिघोषित)

रक्कम रुपये २,००,०००/- च्या वसुलीसाठी दावा दाखल आहे.

२) वादीचे थोडक्यात कथन की, वादी कळंबा महाली, ता. जि. वाशिम येथील रहिवासी असून शेती व कापड चा व्यवसाय करतो. प्रतिवादी हा वादीचे कापड दुकानावर वेळोवेळी येत होता त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचा चांगला परिचय झाला व मैत्री झाली. प्रतिवादीला घर खर्चाकरीता व जागा विकत घेण्याकरीता रुपये २,००,०००/- ची आवश्यकता होती. त्यामुळे प्रतिवादीने वादीकडे रुपये २,००,०००/- उसणे मागीतले. वादीचे व प्रतिवादीचे मैत्रीचे संबंध असल्यामुळे वादीने प्रतिवादीला दिनांक १२.०२.२०२० रोजी नगदी दिले. सदरचे पैसे प्रतिवादीने परत करण्याचे कबुल केले. परंतु वादीने वेळोवेळी पैसे परत मागुनही प्रतिवादीने वादीकडून उसणे घेतलेले रुपये २,००,०००/- परत केले नाही व पैसे देण्याची टाळाटाळ केली.

३) दिनांक १२.०२.२०२० रोजी वादीने प्रतिवादीला रुपये २,००,०००/- दिले त्यावेळी प्रतिवादीने वादीचे हक्कात ५००/- रुपयांच्या स्टॅम्पवर उसनावार चिठ्ठी लिहून दिली व त्यावर वादी यांच्या समोर सही केली.

सदरहु उसनावार चिठ्ठी वादीने प्रस्तुत दाव्यासोबत दाखल केली आहे. वादीने प्रतिवादीला दिनांक ०७.०४.२०२१ रोजी रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठविली परंतु नोटीस मिळून देखील प्रतिवादीने वादीकडून घेतलेले २,००,०००/- रुपये परत केले नाही. करीता वादीने सदरचा दावा दाखल केला आहे.

४) प्रतिवादी याने हजर होवूनही लेखी जबाब दाखल न केल्यामुळे दावा त्याचे विरुद्ध दिनांक १८.१०.२०२३ रोजी माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी विना लेखी जबाब प्रकरण पुढे चालविण्याचा आदेश पारीत केला त्यावरुन प्रतिवादीविरुद्ध दावा विना लेखी जबाब चालविण्यात आला.

५) वादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. पुरेशी संधी देवूनही प्रतिवादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला नाही. त्यामुळे त्यांचे युक्तीवादाविना दावा निकालाकरीता ठेवण्यात आला. पुराव्याचे अवलोकन केले त्यावरुन मी विचारासाठी घेतलेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| (१) प्रतिवादी याला रक्कम रुपये २,००,०००/- उसनावार दिल्याचे वादी सिध्द करतो काय? | ... होय. |
| (२) प्रतिवादी याने वर नमूद उसनावार रक्कम परत केली नसल्याचे वादी सिध्द करतो काय? | ... होय. |
| (३) वादी रक्कम रुपये २,००,०००/- वसुल होऊन मिळणेस पात्र आहे काय? | ... होय. |

(४) आदेश व हुकूमनामा काय? ... अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) वादीने त्याचे पुराव्याचे शपथपत्र (नि.१४) वर दाखल केले. वादीने त्याच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ अभिलेखावर उसनवार चिठ्ठी नि.क्र. १५ प्रतिवादीला पाठविलेली रक्कम मागणीची नोटीस (नि.१६), रजिस्टर पोस्टाची पावती (नि.१७) आदी कागदपत्र सादर करण्यात आलेले आहेत व (नि.१८) वर पुरावा बंदची पुरसीस दाखल केली. प्रतिवादीला पुरेशी संधी देवूनही प्रतिवादीने पुरावा दाखल केला नाही.

७) वादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीला पुरेशी संधी देवूनही प्रतिवादीने युक्तीवाद केला नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या युक्तीवादाविना प्रकरण न्यायनिर्णयाकरीता ठेवण्यात आले. वादीच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीने हजर होवूनही लेखी जबाब दाखल करुन अथवा वादीचा उलटतपास घेवून वादीचे म्हणणे नाकारलेले नाही. त्यामुळे वादीचे म्हणणे अबाधीत राहते. वादीने त्याची बाजु सिद्ध करण्याकरीता अभिलेखावर पुरावे दाखल केलेले आहेत. त्यामुळे वादीने त्याची बाजु सिद्ध केलेली असल्यामुळे वादीचा दावा मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

### मुद्दे क्र.१ ते ४ बाबत

८) पुराव्यातील कथनांची पुनरोक्ती टाळण्यासाठी मुद्दे क्र.१ ते ३ चा

परामर्श एकत्रित घेण्यात आलेला आहे. वादीचा पुरावा (नि.१४) नुसार, वादीचा शेती व कापडाचा व्यवसाय आहे. प्रतिवादी हा त्याचे दुकानावर येत होता त्यामुळे त्यांची ओळख होती. प्रतिवादीने वादीला घर खर्चाकरीता व जागा विकत घेण्याकरीता दोन लाख रुपये उसणे मागणी केले होते. त्यामुळे वादीने दिनांक १२.०२.२०२० रोजी प्रतिवादीला रुपये २,००,०००/– त्यावेळी प्रतिवादीने वादीच्या हक्कात ५००/– रुपयांच्या स्टॅम्पवर उसनावार चिठ्ठी नि. १५ लिहून दिली होती. वादीने प्रतिवादीला वेळोवेळी पैसे परत मागुनही प्रतिवादीने वादीस रक्कम परत न दिल्यामुळे वादीने प्रतिवादीला दिनांक ०७.०४.२०२१ रोजी नि. १६ व १७ नुसार नोटीस पाठविली. नोटीस मिळूनही प्रतिवादीने वादीस रक्कम परत केली नाही. वादीने सदर बाब शपथेवर कथन केलेली असून वादीच्या कथनास नि. १५ ते १७ ने पुष्टी मिळते. याउलट प्रतिवादीने हजर होवूनही वादीच्या पुराव्याचे खंडण केलेले नाही. त्यामुळे वादीचे म्हणणे अबाधीत राहते. त्यामुळे वादीने त्याचे म्हणणे सिद्ध केलेले आहे.

९) प्रतिवादीला पुरेशी संधी देवूनही प्रतिवादीने हजर होवूनही वादीचे म्हणणे नाकारलेले नाही. वादीने त्याची बाजु सिद्ध केलेली आहे. त्यामुळे वादी हा प्रतिवादीकडून रक्कम रुपये २,००,०००/– ची वसुली होवून मिळणेस पात्र आहे. त्यामुळे वादीचा दावा मंजुर करणे उचित होईल असे या न्यायालयाचे मत आहे. सबब, मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ बाबत पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) दावा खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२) वादी प्रतिवादीकडून रक्कम रुपये २,००,०००/– (अक्षरी– दोन लाख रुपये) वसुल होऊन मिळणेस पात्र असून प्रतिवादीने आजपासून ३ महिन्याच्या आत उपरोक्त नमुद रक्कम वादीला परत करावी असे आदेशित करणेत येत आहे.

३) प्रतिवादीने ३ महिन्याच्या कालावधीत वादीला रक्कम रुपये २,००,०००/– (अक्षरी– दोन लाख रुपये) परत केले नाही तर सदर रक्कम न्यायालयीन प्रक्रिये अन्वये वसुल करणेचा अधिकार वादीला राहिल.

४) येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

ANJALI ROHIDAS FAKRABADKAR
Digitally signed by ANJALI ROHIDAS FAKRABADKAR
Date: 2024.09.26 13:23:57 +0530

(श्रीमती अ.रो. फक्राबादकर)

दि.२५/०९/२०२४. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original Order/Judgment.

Name of the Stenographer : T. R. Ugale

Name of court : Smt. A.R. Fakrabadkar
Jt. C.J.J.D. & JMFC; Washim

Date : 25.09.2024

Order/Judgment signed by
the Presiding Officer : 25.09.2024

Order/Judgment uploaded on : 26.09.2024